# प्रेस नोट

मे.ग्लोबल मीटर मॅन्युफॅक्चरींग कंपनी, पुणे यांनी उत्पादीत केलेले ऑटोरिक्षा/टॅक्सी मीटर त्यांना केंद्र शासनाने मंजूर केलेल्या नमुन्यात (मॉडेल अप्रुव्हल) ग्राहकांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने काही फेरबदल केल्याची तक्रार वजा याचिका (क्र.6065/2024) मा.मुंबई उच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेली आहे. सदर याचिकेवर दि.31/01/2025 रोजी झालेल्या सुनावणीत मे.ग्लोबल मीटर मॅन्युफॅक्चरींग कंपनी, पुणे यांनी उत्पादीत केलेल्या ऑटोरिक्षा/टॅक्सी मीटर (Model Approval No.IND/09/06/163) ची विक्री व वितरण पुढील आदेशापर्यंत तात्काळ थांबविण्याचे निर्देश मा.मुंबई उच्च न्यायालय यांनी दिलेले आहेत.

मा.उच्च न्यायालयाचे सदर आदेश विचारात घेऊन वैध मापन शास्त्र यंत्रणेकडून राज्यातील सर्व ऑटोरिक्षा/टॅक्सी चालक/मालक यांना आवाहन करण्यात येते की, मे.ग्लोबल मीटर मॅन्युफॅक्चरींग कंपनी, पुणे यांनी उत्पादीत केलेल्या व Model Approval No.IND/09/06/163 असलेले मीटर यांची पुढील आदेशापर्यंत खरेदी करु नये अथवा नव्याने बसविण्यात येऊ नयेत.

AnyScanner